(70)

दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स : २८१९७६३६

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे-४०११०१

जा.क्र.: मनपा/विधी/४२१/२०१९/२० दिनांक : २३/११/१९

प्रति,

मा. सदस्य सचिव
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष

**विषय :-** राज्यस्तरीय कांदळवन संवर्धन व संरक्षण समितीच्या दि. 20/9/2019 रोजी झालेल्या बैठकीतील सुचनेनुसार केलेल्या पुर्ततेबाबतचा अहवाल.

**संदर्भ :-** 1) दि. 20/9/2019 रोजी कांदळवन संरक्षण व संवर्धन समितीच्या आठव्या बैठकीचे इतिवृत्तांत
2) आपलेकडील पत्र ऑक्टो 2019, जाक्र.ल.ले/71/2019-20

**मा. महोदया,**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध कांदळवनाच्या क्षेत्रात झालेल्या अतिक्रमणाबाबत तसेच मातीभरावाबाबत तक्रारदार श्री. धिरज परब व इतर यांनी मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे विविध तक्रारी अर्ज दाखल केले आहेत.

सदर तक्रारीच्या अनुशंगाने मा. विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दि. 20/9/2019 रोजी कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची आठवी बैठक घेण्यात आली होती. तसेच श्री. धिरज परब यांनी केलेल्या महानगरपालिका क्षेत्रातील तक्रारीनुसार तहसिलदार, ठाणे यांचेमार्फत दि. 08/02/2019 व दि. 08/03/2019 रोजी कांदळवन उपसमितीच्या सदस्यांनी केलेल्या स्थळपाहाणी अहवालानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करणेकरीता संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये निर्देश देऊन व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करणेस विनंती केलेली आहे. तरी तक्रारदार यांनी दाखल केलेल्या तक्रारींच्या अनुशंगाने महानगरपालिकेने केलेल्या कार्यवाहीची तक्रारनिहाय माहिती सोबत जोडून देत आहे.

आपला,

**बालाजी खतगावकर**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

13/11/19

**तक्रार क्र. 70 :-** तक्रारदार श्री. धिरज परब यांची दि. 02/05/2019 रोजीच्या तक्रारी अन्वये मिरा भाईंदर मनपा तथा काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीतील मौजे वरसावे च्या एक्सप्रेस इन हॉटेल - शेल्टर हॉटेल आदी मागील भागात व सी एन रॉक हॉटेल मार्ग भागात कांदळवन - पाणथळ - CRZ - मध्ये मोठया प्रमाणात झालेला बेकायदा भराव, बेकायदा रस्ते.

**महानगरपालिकेमार्फत केलेल्या कार्यवाहीची माहिती :-**

मौजे वर्सोवा, स.क्र. 42, 23, 99, 104 मधील जागा नियोजित विकास योजनेमध्ये 15 मी. रूंद रस्त्यासाठी आरक्षित आहे. सदयस्थितीमध्ये सदर ठिकाणी महानगरपालिकेमार्फत रस्ता विकसित करण्यात आलेला नाही. सदर रस्ता तयार करण्यासाठी सक्षम प्राधिकरणाच्या परवानगीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहे. मौजे वर्सावे येथील एक्सप्रेस इन, शेल्टर हॉटेल आदी मागील भागात व सी. एन. रॉक हॉटेल मार्ग भागात MRSAC नकाशानुसार सदरच्या क्षेत्रात कांदळवन व पाणथळ दिसून येत नाही. त्यामुळे मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कांदळवनाची सर्वेक्षण होऊन कांदळवन क्षेत्राची हद्द कायम करणे आवश्यक आहे. जेणेकरून कांदळवन क्षेत्राचे संरक्षण व 50 मी. बफर झोनच्या हद्दीचे अनुपालन करणे सोईचे जाईल.

तत्कालिन प्रभाग समिती कार्यालय क्र. 3 या कार्यालयामार्फत सदर हॉटेलवर बांधण्यात आलेल्या वेदरशेड यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 260 (1)(2) अन्वये नोटिस बजावण्यात आलेली असून संबंधितांची सुनावणी घेऊन सुनावणी नंतर जाक्र.मनपा/प्र.क्र. 03/अवि/1034/2012-13 दि. 11/01/2013 अन्वये वेदरशेडचे अनधिकृत बांधकाम स्वत: काढून घेणेबाबत आदेश पारीत करण्यात आलेले आहे. परंतु विकासक मे. सेवन ईलेवन प्रा. लि. यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत जाक्र.मनपा/नर/3532/2013-14 दि. 13/12/2013 रोजीच्या पत्रान्वये इमारत प्रकार 2 करीता तळ + 4 मजल्याची सुधारीत बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी असलेला रस्ता वहीवाटीचा होता तसेच तो रस्ता खाजगी मालकीचा आहे. मा. जिल्हाधिकारी यांच्या पत्रानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकामार्फत 1) हॉटेल समोरील कार पार्किंग क्षेत्र 2) जेवणाची शेड 3) लॉन क्षेत्र 4) गोडाऊन

इत्यादी एकूण 2632.00 चौ. मी. बांधकामाबाबत हॉटेल व्यवस्थापका विरोधात एम. आर. टी. पी. अंतर्गत काशिमिरा पोलिस स्टेशन येथे एफ. आय. आर. II 69/2015 दि. 05/10/2015 अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे.

बालाजी खतगावकर
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

Warsawe - Mira Bhayendes.




